नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/07/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## धाडसी चोरी करणा–या अट्टल चोरटयास स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

पो.स्टे खापरखेडा अप.क्र. 326/21 कलम 457,380 भा.द.वि. अन्वये तक्रारदार अर्जुन भुनेंश्वर साव सेवानिवृत्त वे.को.लि. कर्मचारी हे दि. 10/07/2021 रोजी घराला कूलुप लावुन बाहेरगावी परीवारासह गेले असता त्याचे घरी दि. 11/07/2021 रोजी रात्री दरम्यान अज्ञात चोराणे घराचें लॉक तोडुन घरात प्रवेश करुन घरात कपाटात ठेवलेले सोने, चादींचे दागीणे असा एकुण जवळपास 3,25,000/रु चा ऐवज चोरुन नेला. परंतु सदर इसमाचे कृत्य सी. सी.टि.व्ही कॅमेरामध्ये कैद झाले. सदर सी.सी.टि.व्हि फुटेज च्या अनुषंगाने घटनेचे गांर्भीय लक्षात घेता, वरीष्ठांनी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण, येथील पथकास दिलेल्या निर्देशाप्रमाणे व पो.स्टे खापरखेडा यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे तपासाची सुत्रे हलविण्यात आली. त्यानुसार पो.नि. अनिल जिट्टावार स्थानिक गुन्हे शाखा नागपुर (ग्रामिण) यांनी त्याचे अधिनस्त पथकास सदर इसमाचा शोध/समांतर तपास करण्याचे दिलेल्या सुचने नुसार पथक दि.17/07/2021 रोजी पो.स्टें खापरखेडा अंतर्गत परीसरात गस्त करीत असतांना पो.स्टे खापरखेडा येथील स्टॉफ च्या माहितीप्रमाणे एक संशयीत इसम त्यांना हुलकावणी देवुन पळुन गेल्याचे घटनेनुसार स्थानिक गुन्हे शाखा येथील पथकाने तत्परतेने सदर इसमाचा शोध घेवुन त्यास व सोबत असलेल्या इसमास ताब्यात घेतले. सदर संशयीत इसमाने त्याचे नाव गोपाल दुजेराम देवांगन, वय 31 वर्ष, रा.ग्राम जारव्हाय दुर्ग भिलाई–3 ह.मु खापरखेडा, चिचोली ता.सावनेर व त्याचे सोबत असलेला इसम नामे रोहीत उर्फ राजा हिवराज गेडाम, वय 21 वर्ष, रा. जमनापुर, साकोली जि.भंडारा ह.मु. जरीपटका, नागपुर. असे असल्याचे सांगीतले.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने दोन्ही इसमांना विचारपुस केली असता पोलीस स्टेंशन खापरखेडा येथे अपराध क्र. 326/2021 केल्याचे व त्याच प्रमाणे अणखी दोन घरफोडी केल्याची माहीती दिली आहे. त्याच प्रमाणे पो.स्टे. सावनेर, पो. स्टे. काटोल जि. नागपुर (ग्रामिण) पो.स्टे, भंडारा. जि.भंडारा, पो.स्टे गुडीयारी, जि.रायपुर (छत्तीसगड), येथे सुध्दा घरफोडी तसेच मोटर सायकल चोरी केल्याचे दोन्ही आरोपीनी सांगीतले.

सदर दोन्ही इसमांन विषयी अधिकची माहीती घेतली असता, त्याचेवर रायपुर (छत्तीसगड), भंडारा येथे अनेक घरफोडी तसेच मोटर सायकल चोरी चे गुन्हे दाखल असल्याची माहीती मिळाली.

सदर दोन्ही नमुद इसमांना पोलीस स्टेशन खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पो.स्टे. खापरखेडा करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, स.पो.नि अनिल राउत, पो. उप.नि.नरेंद्र गौरखेडे, स.फौ.लक्ष्मीप्रसाद दुबे. पो.हवा.विनोद काळे, पो.हवा.महेश जाधव पो.हवा.राजेश सनोडीया, चा.पो.हवा. भाउराव खंडाते, चा.स.फौ. साहेबराव बहाडे, नापोशी राजु रेवतकर, नापोशी अरविंद भगत, नापोशी शैलेश यादव, नापोशी सत्यशिल कोठारे, पोशी. विरेद्र नरड, पोशी प्रणय बनाफर, पो.शि अजिज दुधकनोज तसेच पो.स्टे.खापरखेडा येथील पो. नि.श्री.भटकर, पो.उप.नि. निमगडे व स्टाफ यांनी सयुक्तीक रित्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर